# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

वार, दिनांक

(वेळ - सकाळी १०.३० ते दुपारी १.००)

(एकूण गुण - १००)

## प्रश्नपत्रिका एक--विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

सूचनाः- प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**प्रश्न १ ला** पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :- **गुण १०**

मधमाशी ही खूप मेहनती आहे. ती फुलाफुलांवर हिंडून मध गोळा करते. पोळ्यामध्ये साठवते. त्यासाठी ती दिवस-रात्र अविश्रांत श्रम करते तिची श्रमावर श्रद्धा आहे. थेंबे थेंबे तळे साचे, असा तिचा विश्वास आहे. इवलीशी मधमाशी आपल्याला सतत उद्योगाचा व बचतीचा महान संदेश देते. आपल्या भविष्यातील सुखासाठी, अडचणीच्या वेळेसाठी आधीपासूनच बचत केली पाहिजे. कितीही रकमेची बचत करा; पण ती नियमित करा. बचतीपासून जसा वैयक्तिक लाभ होतो, तशीच समाजसेवाही होते. आपली बचत राष्ट्राच्या अनेक लोकोपयोगी योजनांसाठी उपयोगात आणली जाते.

**प्रश्न** १) मधमाशी कोणता उपदेश करते ? का ?
२) मधमाशी आपल्याला कोणता संदेश देते ?
३) आपण बचत का करायला हवी ?
४) आपण केलेल्या बचतीचा उपयोग कशासाठी केला जातो ?
५) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या ?

२.	जागतिकीरणाच्या सुरूवातीपासून भारतातील शेतकऱ्यांना एका नवीन संकटाला तोंड द्यावे लागत आहे. शेतमालाचे आधारभाव ठरविताना सरकारी यंत्रणा आंतरराष्ट्रीय भावांची तुलना करते व त्यानुसार सध्याच्या आधारभावात वाढ देण्याऐवजी त्यात घटच करून भाव ठरविण्यात येतात. पूर्वीच्या आधारभावात जरी नुकसान सहन करावे लागत होते तरी त्यावर मात करून भारतातील शेतकरी काही अंशी उत्पादन खर्च व काही अंशी कौटुंबिक खर्चात कपात करून जीवनाचा गाडा ढकलत असे. परंतु, आता परदेशातून शेतमाल आयात करू म्हणून धमकी देत आधारभावात आणखी कपात करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणखी वाढत असल्याचे तज्ज्ञांना दिसून आले आहे. एकीकडे औद्योगिक वस्तूंच्या वाढत्या किंमतीमुळे उत्पादन खर्च वाढतो आणि एकीकडे आधारभावात कपात केल्याने उत्पादनाची किंमत कमी होते. अशा दुहेरी कात्रीत सध्या भारतीय शेतकरी सापडला आहे.

**प्रश्न**	१) भारतीय शेतकऱ्याला संकटात सापडण्याचे कारण कोणते ?
२) सरकारी यंत्रणा शेतमालाचे भाव कसे ठरविते ?
३) शेतकरी आपले जीवन कसे चालवित असे ?
४) सरकार शेतकऱ्यांना कोणती धमकी देते ?
५) सध्या शेतकरी कोणत्या दुहेरी कात्रीत सापडला आहे ?

३.	वाङ्मय हा जीवनाचा आरसा आहे, असे माणतात. 'Literature is a Mirror in which Life is reflected' असे इंग्रजीत म्हटलेही आहे. या परिभाषेत थोडा बदल करून असे म्हणता येईल की, शाळा ही समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे त्याचे कारण समाज जीवनाची जडणघडण ही शाळेतील संस्कारांत होत असते. समाजातील नागरिक शाळेमध्ये घडविले जातात. 'जशी शाळा तसा समाज' असे म्हटल्यास वावगे होणार नाही. समाजात कशा प्रकारचे नागरिक हवे आहेत, हे कार्यक्षम शासन शैक्षणिक धोरणात ठरवित असते. उदाहरण द्यावयाचे झाले तर, यापूर्वी भारतावर दीडशे वर्षे राज्य करणाऱ्या ब्रिटिश शासनाचे देता येईल. भारत पूर्णपणे त्यांच्या अंमलाखाली आल्यावर लॉर्ड मेकॉलेने प्रसिद्ध केलेल्या शिक्षणविषयक खलित्यात ब्रिटिशांच्या शिक्षणविषयक धोरणाची बीजे दिसून येतात. ब्रिटिशांचे धोरण या देशातील राज्यकारभार चालविण्यासाठी शासकीय कचेऱ्यांतील कारकून व त्यांसाठी प्राथमिक शिक्षण तयार करणे हे होते. म्हणून त्यांनी त्या दृष्टीने शैक्षणिक धोरणाची आखणी केली व अंमलबजावणीही केली.

लेखक-मुकुंद वासुदेव अत्रे.

**प्रश्न**	१) जीवनाचा आरसा कशास म्हटले आहे ?
२) शाळेतील संस्कारांचे महत्त्व स्पष्ट करा.
३) लॉर्ड मेकॉलेच्या शैक्षणिक धोरणाचे वैशिष्ट्य कोणते ?
४) शैक्षणिक धोरणात कोणती गोष्ट ठरविले जाते ?
५) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

४. अनेक व्यवसाय अगदी छोटे असतात आणि छोटेच राहणे अपरिहार्य आहे. मात्र त्यापैकी काहींतून मोठे धंदे सुरू होणं शक्य आहे. जेवणाचे डबे तयार करणाऱ्या दोन-तीन स्त्रियांनी स्वतःची उपहारगृहे सुरू केल्याचे मला माहीत आहे. सौंदर्य प्रसाधगृहांचा धंदाही बराच मोठा होऊ शकतो. प्रवास कंपन्या आणि घरबांधणीचा धंदा तर खूपच मोठं स्वरूप धारण करू शकतो. जाहिरात आणि प्रसिद्धी करण्याचा छोटासा व्यवसाय सुरू करून तो बराच मोठा करणारी मराठी मंडळी आहेत, आणि खरा जो कर्तबगार मनुष्य आहे, तो तर अणूतून ब्रह्मांड निर्माण करू शकतो. मोटारींची दुरूस्ती करता करता आबासाहेब गरवारे कुठल्या कुठे कसे जाऊन पोहोचले ते आपण सर्वांनीच पाहिले आहे. पण यांपैकी अनेक व्यवसाय जरी लहानच राहिले, तरी धंदा करण्यासाठी लागणाऱ्या मनोवृत्तीचा आणि गुणांचा विकास त्यामुळे होतो आणि स्वतंत्र धंदा करण्यासाठी अनुकूल अंत वातावरण त्यातून निर्माण होतं, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातील उद्योजकतेचा विकास होण्यासाठी हे वातावरण निर्माण होणं अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रा. गंगाधर गाडगीळ.

**प्रश्न** १) लेखकाने या उताऱ्यातून कोणत्या छोट्या उद्योगांचे वर्णन केले आहे ?
२) लेखकाच्या मते खऱ्या कर्तबगार माणसाची लक्षणे कोणती ?
३) कोणते व्यवसाय लहानातून मोठे होऊ शकतात? काही उदाहरणे द्या.
४) स्वतंत्र धंदा करण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते ?
५) महाराष्ट्रातील उद्योजकतेचा विकास होण्याकरिता कोणत्या गोष्टींची गरज आहे ?

५. मुलांच्या मनोवृत्तीला कुठलेही, कसलेही बंधन नसल्यामुळे ती स्वतंत्र वातावरणात विहार करतात. ही आमची जात, हा आमचा धर्म, हा आमचा पंथ, हा आमचा देश अशा आकुंचित वातावरणातून ज्यांना बाहेर आणण्याचा प्रयत्न आमच्या संस्थेत केला जातो. "हे विश्वची माझे घर" अशी त्यांची मनोवृत्ती बनावी अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. साधारणपणे इतरत्र मुलांना धर्माभिमान शिकवून त्यांची मने मुद्दाम आकुंचित केली जातात. यामुळे जगातील इतर राष्ट्रांच्या संस्कृती, भाषा यांचे आकलन करणे त्यांना दुष्कर होते. भावी आयुष्यात जेव्हा दोन संस्कृतींचे एकीकरण व्हावे अशी इच्छा जागृत होते, त्यावेळी ही आकुंचित बुद्धी आड येते. विश्व बंधुत्वाची भावना उद्‌भूत न होण्यास ही परिस्थिती कारणीभूत झाल्याशिवाय राहत नाही.

-रवींद्रनाथ टागोर

**प्रश्न** १) मुलांची मनोवृत्ती कशी असते ?
२) "हे विश्वची माझे घर" या अर्थाने दुसरे कोणते शब्द आले आहेत ?
३) रवींद्रनाथांच्या संस्थेत कोणते ध्येय समोर ठेवले जाते ?
४) इतर संस्थांतून सामान्यतः कोणती शिकवण मिळते ?
५) इतर संस्थांतून मिळणाऱ्या शिकवणुकीचे विद्यार्थ्यांवर कोणते परिणाम होतात ?

६.	स्वच्छता, शिक्षण आणि स्वावलंबन ह्यांवाचून अज्ञ जनतेचा उद्धार होणार नाही, हे एकसारखे आपल्या कीर्तनात ते उपदेशीत असतात. गरिबांच्यासाठी आजपर्यंत लाखो रुपयांच्या धर्मशाळा, घाट अन्नछत्रे पाणपोया, पूल त्यांनी महाराष्ट्रात बांधले, पण त्याचा कुठे गाजावाजा नाही. अस्पृश्यांच्या उद्धार ज्यावेळी कुठे शब्दही ऐकू येत नव्हता, तेव्हा पंढरपूरला त्यांनी लाख रुपये खर्चून अस्पृश्यांसाठी "चोखामेळा धर्मशाळा" बांधली. डोंगराएवढे विधायक कार्य त्यांनी या देशात करून ठेवले आहे. आम्ही एक रस्ता साफ केला किंवा एक तळे उकरले तर केवढा गाजावाजा करतो ! प्रत्येक माणूस हेच एक परमेश्वराचे देऊळ आहे, माणसांची सेवा हीच ईश्वराची पूजा आहे, असा सर्व भूतांमध्ये ज्यांना भगवंताचा साक्षात्कार झालेला आहे, असे गाडगे महाराज हे महाराष्ट्रामधले एक महान समाजवादी संत आहेत. गरिबांची नि दलितांची ज्यांना त्यागपूर्वक सेवा करावयाची आहे आणि प्रेमावर आधारलेली समता समाजात प्रस्थापित व्हावी असे ज्यांना अंतःकरणापासून वाटते, त्यांना आपल्या स्फूर्तीचे घट गाडगेबाबांच्या जीवनातून आणि कीर्तनामधूनच भरून घ्यावे लागतील.

**प्रश्न**	१) गाडगेबाबा आपल्या कीर्तनामधून कोणता उपदेश देत ?
२) गाडगेबाबा गरिबांसाठी महाराष्ट्रात कोणते विधायक कार्य केले ?
३) "चोखामेळा धर्मशाळा" बांधण्यामागे गाडगेबाबांची कोणती भूमिका होती ?
४) गाडगेबाबांची ईश्वराच्या पूजेची कोणती कल्पना होती ?
५) गाडगेबाबांना "एक महान समाजवादी संत" असे का म्हणतात ?

७.	भारतातील लोकशाही मूल्यांची जपवणूक करण्याची जबाबदारी आज आम्हा विद्यार्थ्यांवर आहे. आज मिळणारे शिक्षण हे जरी जीवनोपयोगी नसेल तरी शिक्षणाची खरी मूल्ये आम्ही आपल्या आयुष्यात जोपासली पाहिजेत. समाज आणि राजकारण यापैकी राजकारणापासून दूर राहून समाजाच्या सुखदु:खाशी आम्ही समरस व्हायला हवे, त्यातूनच समाजाच्या उन्नतीचा मार्ग आम्हास सापडेल. आपण ज्ञान मिळविल्यावर; आपल्या ज्ञानाचा आणि सेवेचा उपयोग समाजासाठी केल्यास, समाज प्रगतीपथावर जाईल. त्यासाठी प्रामाणिकता, चिकाटी आणि देशप्रेम याची आम्हास जाणीव हवी. भारतासारख्या विशाल देशात स्वातंत्र्यपूर्व काळात स्वदेशी शिक्षणाचे व्रत घेऊन पुढे जाणाऱ्या लोक-पुढाऱ्यांच्या कार्याचे मूल्य आम्हास समजावयास हवे. आजच्या शिक्षणात आम्ही प्रामाणिकपणे या मूल्यांची जपवणूक केली तर खऱ्या अर्थाने आम्ही लोकशाही मूल्यांचे गणले जावू.

**प्रश्न**	१) समाज केव्हा प्रगतीपथावर जाईल ?
२) आपण कशापासून दूर राहायला हवे ?
३) आज विद्यार्थ्यांवर कशाची जबाबदारी आहे ?
४) या उताऱ्यामध्ये कशाची जाणीव करून देण्यात आली आहे .
५) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

८.	आळशी माणूस हा सतत आरामाची अपेक्षा करत असतो. तर खरा काम करणारा माणूस आराम हराम है? असे मानतो. रात्रीची पाच-सहा तास झोप ही विश्रांतीसाठी पुरेशी ठरते. इतर वेळी त्याने सतत काम करत रहावे. उगाचच बसून राहिल्याने अंगात आळस वाढतो. उलट प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की काळ हा सतत पुढे जात असतो. तो कोणासाठीही थांबत नसतो. आपण तो आळसात व्यर्थ दवडला तर आपला कार्यभाग साधणार नाही. सतत तेच काम करत राहिल्यास कंटाळा येतो म्हणून तर सहा दिवस काम केल्यावर रविवारी सुट्टी येते. त्या दिवशी आळसात लोळत पडण्यापेक्षा माणसाने छंदात रमून जावे.

**प्रश्न** १) आळशी माणूस व परिश्रमी माणूस यांच्यात कोणता फरक असतो ?
२) प्रत्येकाने कोणती गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ?
३) सुट्टीच्या दिवशी काय करावे ?
४) "आळशी माणूस" म्हणजे याची व्याख्या करा ?
५) "काळ" हा सतत पुढे जात असतो असे का म्हटले आहे ?

९.	विचाराने एखादी गोष्ट समजावून दिली की ती माणसाला पटते. समजावून देण्याऐवजी भय दाखवून मार देण्याची भीती दाखवून पटविण्याचा प्रयत्न केला तर भीती निर्माण होते. भीती न दाखवावी तर माणूस स्वच्छंदी बनतो. सिंहाचे बळ त्याच्या दातांत आहे, हत्तीचे सामर्थ्य सोंडेत आहे, गाई-बैलांची शक्ती त्यांच्या शिंगात आहे, तसे मानवाचे सर्वस्व कोणते ? तर माणसाची शक्ती त्याच्या बुद्धीत आहे. निर्बुद्धपणाने वागून तो आपले सामर्थ्य न ओळखील तर आपली शक्ती तो गमावून बसेल माणसाच्या या बुद्धिसामर्थ्याला नीट मार्गावर ठेवण्यासाठी जो प्रयत्न केला जातो तो सत्याग्रह किंवा सत्यदर्शन !

प्रश्न १) भयामुळे काय होते ?
२) माणूस आपली शक्ती केव्हा गमावून बसेल ?
३) सत्याग्रह किंवा सत्यदर्शन म्हणजे काय ?
४) ह्या उताऱ्यामध्ये विशद केलेली बल स्थाने सांगा ?
५) शक्ती पेक्षा बुध्दी श्रेष्ठ असे आपणास वाटते का ?

१०.	निसर्ग महान जादूगार आहे. तो अतर्क्य असून त्याचे चमत्कार, त्याच्या लीला अगाध आहेत. निसर्ग प्रसन्न रमणीय सौंदर्यशील आहे. त्याच्या संगतीत रमाताना कळत नकळत आपण खूप गोष्टी शिकतो. आपण अंतर्मुख होतो. विचार करू लागतो. दुथडी भरून वाहणारी नदी, उडी घेणारे जलप्रपात, वाहता झरा हे सारे आपल्याला जणू "पुढे जा, पुढे पुढे जात रहा" असा संदेश देत राहतात. आसमंत गंधित करणारे सुगंधी फूल, रिझवणारा वारा, शीतल छाया देणारा, रसाळ फळे देणारा वृक्ष, आपल्या कृपेची बरसात करणारा मेघ हे सारे आपल्याला देते व्हा, देण्यातला आनंद लुटा हा कानमंत्र देत राहतात.

**प्रश्न** १) निसर्ग आपल्याला काय शिकवतो ?
२) निसर्ग कोणता कानमंत्र देतो ?
३) कृपेची बरसात कोण करतो ?
४) निसर्ग महान जादूगार असे का म्हटले आहे ?
५) या उताऱ्यातील वर्णन अल्हाददायक का वाटते ?

११.	तो सूर्य पाहा. त्याचे दर्शन म्हणजे परमात्म्याचे दर्शन. तो नाना प्रकारची चित्रे आकाशात रंगवीत असतो. चित्रकार महिनेच्या महिने कुंचले मारून सूर्योदयाची चित्रे रंगवितात. सकाळी उठून जरा पाहा परमेश्वराची कला. त्या दिव्य कलेला त्या अनंत सौंदर्याला उपमा तरी देता येईल का ? पण पाहतो कोण ? तिकडे तो सुंदर भगवान उभा राहून म्हणतो, "आळशा, "तू निजू पाहशील, परंतु मी तुला उठविणार आहे" स्थावन जंगमाचा" सूर्य  हा आत्मा आहे. हा मित्र लोकांना हाक मारतो, त्यांना काम करावयास लावतो. त्याने स्वर्ग पृथ्वीचे रूप धारण केले आहे. खरोखरच तो सूर्य जीवनाचा आधार आहे.

**प्रश्न**	१) आकाशातली दिव्य कला कोणाची आहे व त्याला काय देणे शक्य नाही ?
२) सूर्याच्या दर्शनातून कोणाचे दर्शन होते ?
३) सूर्य कशाचा आत्मा आहे ?
४) सूर्य हा चित्रकार आहे असे का वाटते ?
५) स्थावर जंगमाचा सूर्य हा आत्मा आहे असे का म्हटले आहे.

१२.	विनयशीलतेला साजेसा शास्त्रीजींच्या वागण्यातला साधेपणा होता. त्यांनी स्वतःसाठी दोन सदरे, दोन धोतरे आणि एक टोपी याशिवाय जास्त कपडे कधीच वापरले नाहीत. अशी त्यांच्या भगिनीने आठवण सांगितली आहे. हे सर्व कपडे खादीचे असत. सोळा ते अठरा तास ते काम करीत असत. कामात ते कितीही व्यग्र असले तरी ठरलेली कामे, त्यांच्या लक्षात असत. त्यांचा स्वभाव अतिशय शांत होता. जेव्हा शपथविधीला जायचे होते तेव्हा शास्त्रीजी शांतपणे कामकाज पहात होते. शास्त्रीजींच्या लक्षात आहे की नाही अशी शंका वाटून बिचाऱ्या सेक्रेटरीची मात्र सारखी चुळबूळ चालली होती. सौम्य स्वभावाच्या शास्त्रीजींच्या चेहऱ्यावर मात्र अजिबात काही भावदर्शन नव्हते. ठरलेली वेळ होताच हातातले काम एखाद्या यंत्राप्रमाणे थांबले. शास्त्रीजी जागचे उठले, बाहेर पडले आणि राष्ट्रपती भवनाकडे चालत निघाले शपथविधीसाठी असे शांत आणि वक्तशीर वागणारे शास्त्रीजी होते.

**प्रश्न**	१) शास्त्रीजींच्या भगिनीने कोणती आठवण सांगितली आहे ?
२) शास्त्रीजींच्या सेक्रेटरीची चुळबूळ का चालली होती ?
३) शास्त्रीजी राष्ट्रपती भवनाकडे कशासाठी गेले ?
४) शास्त्रीजींचे स्वभाव वर्णन करा ?
५) शास्त्रीजींच्या कामकाजाचे वर्णन करा ?

१३.	मदर टेरेसाचा जन्म युगोस्लाव्हिया देशात बेलग्रेडपासून काहीशा दूर अशा स्कोपये गावी झाला. तिची आई एका कष्टशील कुटुंबातील होती. वडील एक छोटेसे दुकानदार होते. टेरेसाचे नाव तिच्या आईवडिलांनी मोठ्या कौतुकाने ॲग्नेस ठेवले. ॲग्नेस केवळ आपल्या आईवडिलांचीच नव्हे तर इतर कुटुंबियांचीही लाडकी होती. लहानपणी आपल्या आईला घरकामात टापटिपीने मदत करण्याची तिची भारी हौस. वडील दुकानदार म्हणजे हिशेबी, व्यवहारी. ॲग्नेस वडिलांप्रमाणे नफा-नुकसान पाहत असे. कुटुंब बेताचे, मिळकत बेताची, श्रीमंती नाही, तशी गरिबीही नाही. मात्र प्रेम-सुख-समाधान त्यांच्या कुटुंबात नांदत असे. मानवी दु:खांवर ती चिंतन करी. ती एकलकोंडी व चिंतनशील बनली. अज्ञात हुरहुरीपासून निर्माण होणारा भावनावेग सोसणे कठीण झाल्यावर ती एके रविवारी चर्चमध्ये गेली आणि नम्र भावाने येशूपुढे नतमस्तक होऊन उद्‌गारली, "प्रभो, मी येत आहे ! प्रभो, मी येत आहे! "

**प्रश्न**	१) ॲग्नेस एकलकोंडी व चिंतनशील का बनली ?
२) मदर टेरेसाचा जन्म कुठे झाला ?
३) चर्चमध्ये जाऊन ॲग्नेसने काय केले व का ?
४) ॲग्नेसच्या घरची परिस्थिती कशी होती ?
५) ॲग्नेसला कोणत्या गोष्टीची आवड होती ?

१४.	झिनी पहाटेच उठायची, गोळा केलेल्या काटक्या पेटवायची. मातीच्या तीन-चार कप ठेवायची आणि बकरीचे दूध काढायला जायची. अंगणात एक काटेरी झुडूप होते. त्याच्या बुंध्याला नारळाची दोरीने शेळी बांधलेली असायची नि तिच्या शेजारीच एक गोजिरवाणे पिलू असायची. त्या पिलाला आई नव्हती. ही शेळी त्या पिलाला पाजायची, चाटायची बरोबर चरायला न्यायची. तेही सारखे सारखे तिच्या पायापायांतच घुटमळायचे. त्याच्या आईनेही केले नसते, एवढे प्रेम ती शेळीवर करायची, म्हणतात ना, "माय मरो पण मावशी जगो." झिनीचा त्या पिलावर खूप जीव होता, ती त्याला खांद्यावर घ्यायची, मांडीवर झोपवायची. रोज ढोरे चरायला नेली की त्या पिलामागेच असायची. पिलाला ती "पिठी" म्हणायची भाकरीच्या पिठासारखी पांढरी गोंडस होती. पिठी एखादे दिवशी दूध प्यायची नाही. बसूनच राहायची, नुसती कोठेतरी पाहत, उगाचे तोंडात नसलेला चारा चावत. मग झिनी म्हणायची, "आईची आठवण येत असेल तिला." झिनीला तरी कुठे होती आई ? पण तिचा बाप गेनू तिला खूप लाडाने वागवायचा, तिला आईची आठवण होऊ द्यायचा नाही.

**प्रश्न**	१) पिठी कोण आहे ? ती दिसायला कशी आहे ?
२) झिनी पिठीवर कशा प्रकारे प्रेम करीत असे ?
३) झिनीने पिठीचे नाव पिठी का ठेवले होते ?
४) झिनीच्या वडिलांचे नाव काय होते ? ते झिनीवर खूप प्रेम का करीत ?
५) पिठीला आईची आठवण येत असेल असे झिनीला केव्हा वाटे ?

१५.	जंगलची मोठ्या प्रमाणात तोड होत असल्यामुळे मुख्यत्वे खेड्यापाड्यामध्ये स्वयंपाकासाठी ऊर्जेचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. आजघडीला जंगल तोडीचा वेग एवढा प्रचंड आहे की, रोजच्या रोज सकाळ-संध्याकाळ अन्न शिजवता यावे म्हणून त्यासाठी आवश्यक लाकूडफाटाही मिळणे दुरापास्त झाले आहे. जंगल नष्ट झाल्याने लाकूडफाटा व जळावू सरपणाचा शोध घेवूनही ते मिळत नसेल तर दररोज चूल पेटवायची कशी, हा प्रश्न ग्रामीण भागात रोजचीच डोकेदुखी झाला आहे. या प्रश्नावर नुसताच उपाय नव्हे तर एक कायमस्वरूपी तोडगा म्हणून "सांजचुली"चा प्रयोग समर्पक उत्तर ठरू शकतो, हे नाशिक जिल्ह्याच्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातील मोरंबी गावच्या आदिवासींनी सप्रमाण दाखवून दिले आहे.

**प्रश्न**	१) जंगलतोडीमुळे कोणता प्रश्न तीव्र होत चालला आहे ?
२) कशाचा वेग प्रचंड आहे ?
३) जळावू सरपण मिळणे का दुरापास्त होत चालले आहे ?
४) सांजचुलीचा प्रयोग कोठे करण्यात आला ?
५) ग्रामीण भागातील रोजची डोकेदुखी कोणती ?

१६.	दिवाळीत आपण जे अग्निबाण उडवतो, त्यामधील दारू जळते व विविध वायू निर्माण होतात. हे वायू जितक्या जोरात बाहेर पडतात, त्या प्रमाणात अग्निबाण अधिक उंच जातो. अंतराळयान उडवण्यासाठी वापरले जाणारे रॉकेटही याच तत्त्वावर आधारित असते. रॉकेटमधील इंधन घन किंवा द्रव यापैकी कोणत्याही स्वरूपात असून ते ज्वालाग्राही पदार्थ आणि ऑक्सिडीकारक पदार्थ या दोन घटकांचे मिश्रण असते. द्रवरूपी इंधन हे घनरूपी इंधनापेक्षा जास्त बल निर्माण करते, तसेच ते प्रवाही असल्यामुळे त्याचा वापर जास्त नियंत्रितपणे करता येतो. मात्र बऱ्याचदा एकाच अंतराळयानात दोन्ही प्रकारची इंधने वापरली जातात. काही वेळात तर इंधनाचा एक घटक हा घनस्वरूपातला तर दुसरा घटक हा द्रवरूपी असू शकतो.

**प्रश्न**	१) वायू कशामुळे निर्माण होतो ?
२) अग्निबाण अधिक उंच का जातो ?
३) रॉकेट कोणत्या तत्त्वावर आधारित आहे ?
४) जास्त बल कोण निर्माण करते ?
५) द्रवरूपी इंधनाचा वापर जास्त नियंत्रितपणे का करता येतो ?

१७.	पृथ्वीवरील जीवनसृष्टी संरक्षक असलेला ओझोनचा थर विरळ होणे ही जगातील आतापर्यंतची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या! १९८५ साली जगाला या समस्येची माहिती झाल्यानंतर आजपर्यंत म्हणजे २४ वर्षे या समस्येची भरपूर चर्चा झाली. त्याच्यामुळे माणसासह जीवसृष्टीवर विपरित परिणाम होण्याचा धोका व्यक्त केला गेला. त्वचेच्या कर्करोगाच्या माध्यमातून माणसाला हे परिणाम सोसावेसुद्धा लागले. पण दोन-तीन वर्षापासून या समस्येबाबत आशावादी चित्र निर्माण झाले आहे. कारण आता ओझोनचा थर विरळ होणे जवळजवळ थांबले आहे. अर्थात वातावरणात असलेले ओझोनचे अस्तित्व कमी होण्यास काही वेळ लागणार असल्याने लगेचच हा थर पूर्ववत होणार नाही, तर त्याला आणखी पाच-पन्नास वर्षे लागतील. पण ओझोनचा थर नष्ट करणाऱ्या वायूंची निर्मिती जवळजवळ थांबली असल्याने ही समस्या आता संपल्यात जमा आहे. इतकी गंभीर समस्या सुटली ती, जग एकत्र आल्यामुळे आणि ओझोनला घातक ठरणारे सीएफसी व इतर वायू न वापरण्याचे सर्वांनी मिळून ठरविल्यामुळे ! जगात विविध देशांमध्ये तऱ्हेतऱ्हेच्या समस्या असल्या आणि त्यांची वेगवेगळी विचारसरणी असली तरी सर्वजण या मुद्यावर एकत्र आले हे विशेष ! त्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रमांतर्गत ओझोन कृती गटाने पुढाकार घेतला आणि सर्वांनी हा विषय पटवून देऊन त्यानुसार वागण्यास भाग पाडले.

**प्रश्न**
१) सर्वांत गंभीर पर्यावरणीय समस्या कोणती ?
२) त्वचेचा कर्करोग होण्याचे एक कारण कोणते ?
३) ओझोनचा थर पूर्ववत का होणार नाही ?
४) ओझोनची गंभीर समस्या का सुटली ?
५) सर्वजण कोणत्या मुद्यावर एकत्र आले ?

१८.	धरणे, खाणी, कारखाने, ऊर्जानिर्मिती, रस्ते असे प्रकल्प अंमलात आणण्यासाठी जगात दरवर्षी १०० लक्ष लोकांना विस्थापित म्हणून जगावे लागते. उदरनिर्वाहासाठी त्यांना दुसरा पर्याय नाही. लक्षावधी लोकांना उपजीविकेसाठी अनिच्छेने तरीही आपण होऊन आपल्या गावाबाहेर पडावे लागते. यामागचे एक कटू सत्य असेही आहे की, या सर्व लोकांसाठी त्यांच्या गावी "रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे अशक्य आहे. विस्थापित लोक गरीब असतात, दुर्बल असतात आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला टाकलेले असतात. विस्थापितांतील स्त्रिया आणि मुले तर अधिकच आरक्षित असतात. त्यांचा गैरफायदा घेण्यात, त्यांची पिळवणूक करतात  त्यांचे शेषण करण्यात समाजातील इतर लोकांसोबत विस्थापितांतील पुरूषवर्गही सामील असतो. विकासाच्या योजना अंमलात आणण्यासाठी भारतात दरवर्षी पाच लक्ष लोक विस्थापित होतात.

**प्रश्न**
१) लोकांना विस्थापित म्हणून का जगावे लागते ?
२) विस्थपित लोक कसे असतात ?
३) समाजातील लोक कुणाचा गैरफायदा घेतात ?
४) विस्थापितांना कोणती संधी उपलब्ध करून द्यावयास हवी ?
५) भारतात दरवर्षी किती लोक विस्थापित होतात ?

१९.	जगभरात एकूण दहा हजारांहून अधिक भाषा बोलल्या जात असून त्यातील निम्म्याहून अधिक नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यापैकी भारतात ज्या १६५२ भाषा बोलल्या जातात, त्यातील २२ भाषा मान्यताप्राप्त आहेत. एखादी भाषा नष्ट होणे म्हणजे त्या भाषेशी निगडीत सर्व सांस्कृतिक आणि सामाजिक दस्तऐवज कायमचे काळाच्या पडद्याआड जाणे होय. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने २००८ हे आंतरराष्ट्रीय भाषा वर्ष म्हणून जाहीर केले होते. संस्कृत ही भारतीय उपखंडातील एक प्राचीन आणि समृद्ध साहित्याची परंपरा असणारी भाषा. देवनागरी लिपीतील सर्व भाषांची जननी. मात्र आधुनिकतेच्या रेटयात ही भाषाही हळूहळू ऱ्हास पावत आहे. युनोने जाहीर केलेल्या भाषा संवर्धनाच्या या उपक्रमात आपलेही योगदान असावे, या हेतूने मुंबईतील सुभाष भांडारकर यांनी लहानपणी पाठ केलेली आणि अद्याप स्मरणात असलेली संस्कृत सुभाषिते संकलिते करून त्याचे एक पुस्तक "आठवणीतील संस्कृत सुभाषिते" म्हणून प्रसिद्ध केले. बहुतांश इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या आताच्या पिढीला या संस्कृत सुभाषितांचा आस्वाद घेता यावा म्हणून त्यांचा मराठी तसेच इंग्रजीत भावार्थही या पुस्तकात त्यांनी दिला आहे.

**प्रश्न**	१) भारतात किती भाषा बोलल्या जातात व त्यापैकी किती मान्यताप्राप्त आहे.
२) भाषा नष्ट होणे म्हणजे काय ?
३) देवनागरी लिपितील भाषांची जननी भाषा कोणती ?
४) भांडारकर यांनी कोणते पुस्तक संकलित केले आहे ?
५) संयुक्त राष्ट्र संघाने कोणते वर्ष आंतरराष्ट्रीय भाषा वर्ष म्हणून जाहीर केले होते ?

२०.	ज्याला जीवनातील विसंगतीची जाण असते, सौंदर्याचे भान असते आणि सुसंस्कृत प्रगल्भ मनाचा समाज अस्तित्वात यावा, अशी तळमळ असते, तोच चांगला विनोद निर्माण करू शकतो. अर्थात त्याच्याजवळ विनोदबुद्धी असणे सर्वात महत्त्वाचे असते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी म्हटल्याप्रमाणे विनोद हे दुधारी शस्त्र आहे. हे शस्त्र चालविणाऱ्याची भूमिका उन्मत्त व निर्दयी मारेकऱ्याची असता उपयोगी नाही, तर ती कुशल व सहृदयी शल्यविशारदाची असायला हवी. शरीराचा दोषपूर्ण दुखणारा नेमका भाग ज्याप्रमाणे तो हळुवारपणे व नेमक्या सावधगिरीने कापून काढतो, त्याचप्रमाणे विनोदकाराला व्यक्ती व समाज दोषमुक्त होऊन सुंदर व सुसंस्कृत होण्याची आंतरिक तळमळ असावी लागते. असे असेल तर सहृदयतेने तो निरोगी, न बोचणारा, हसत खेळत दोष दाखविणारा विनोद निर्माण करील. जीवनाविषयी आस्था, प्रेम त्याचबरोबर तारतम्य असणेही गरजेचे असते. दोषनिराकरणासाठी दोषधारकाने स्वयंस्फूर्तीने तयार होणे महत्त्वाचे असते.

प्रश्न	१) चांगला विनोद कोण निर्माण करू शकतो ?
२) विनोद हे कसे शस्त्र आहे ?
३) विनोदाचे शस्त्र चालविणाऱ्याची भूमिका कशी असावी ?
४) विनोदकाराला कसली तळमळ असली पाहिजे ?
५) दोषनिराकरणासाठी दोषकाराने कशा पद्धतीने तयार होणे महत्त्वाचे आहे ?

२१. सध्या पर्यावरणाकडे सर्व मानवजातीनेच जागरुकतेने पाहण्याची आवश्यकता आहे. माणूस निसर्गाकडून, पृथ्वीकडून अनेक गोष्टी ओरबाडून घेतो. माणसाचे आक्रमण जंगलांवर, प्राण्यांवर, जीवसृष्टीवर सर्व बाजूने होत आहे. आणि बिचारा निसर्ग , वनस्पती, प्राणी माणसासमोर हतबल आहे. निसर्गाच्या चक्राचा समतोल माणूस बिघडवत आहे, तो जर सांभाळला गेला नाही, तर निसर्गाच्या घात चक्राला माणसाला सामोरे जावे लागेल. त्याची चुणूक निसर्ग दाखवण्याचा प्रयत्न करतो, कधी भूकंपाच्या माध्यमातून, तर कधी त्सुनामीच्या माध्यमातून, तर कधी : अतीवृष्टीद्वारे पूरसादृष्य परिस्थिती निर्माण करुन, तर कधी कोरडा दुष्काळ पाडून, कधी उष्णतेचे चटके देऊन माणसाला जागृत करण्याचा प्रयत्न करतो . पण माणसाच्या डोळयाला लावलेल्या स्वार्थाच्या झापडामुळे माणसाला ते दिसत नाही, दिसले तरी जाणिवेपर्यत पोहचत नाही. काना-डोळा करण्याची वृत्ती खूपवेळा असते. निसर्गात एक सुसंबद्ध योजना आहे. चक्र आहे. हे चक्र माणूस मांडतो. ही सर्व सृष्टी आपली दास आहे.आपण याचे मालक आहोत, असा माणूस वागवतो. पंचमहाभूत जणू फक्त आपल्याच सुखासाठी निर्माण झाली आहेत असा माणूस समज करुन घेतो आणि प्रदूषण वाढवतो.

**प्रश्न** १) पर्यावरणाकडे मानवजातीने कोणत्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे ?
२) माणसाने कोणाकोणावर आक्रमण केले आहे.?
३) निसर्ग माणसाला कशा प्रकारे जागृत करतो ?
४) माणसाच्या डोळयाला कशाचे झापड लावले आहे ?
५) माणूस कसा वागतो ?

२२. जलसंधारण क्षेत्रामध्ये झालेल्या महत्वाकांक्षी संधारणांमुळे पश्चिम महाराष्ट्र हा आर्थिकदृष्टया सक्षम असणारा भाग संपन्नतेकडे वाटचाल करीत आहे.संपूर्ण महाराष्ट्राला मिळणाऱ्या एकूण महसुली उत्पन्नापैकी पश्चिम महाराष्ट्राचा हिस्सा हा सर्वात मोठा आहे. शेतीबरोबरच सहकाराच्या माध्यमातून या परिसरात झालेल्या विकासात्मक शेतीपूरक उपक्रमांमुळे या परिसरात जनसामान्य जीवन सुकर बनले आहे.सोलापूर, सातारा, पुणे जिल्हयास वरदान ठरलेले उजनी धरण व नीरा डावे उजवे कालवे हे उपक्रम पश्चिम महाराष्ट्रमध्ये साकारण्यास ब्रिटिश सरकारचे ध्येयधोरण महत्वपूर्ण आहे. किंबहुना अशा प्रकारचे महत्वाकांक्षी उपक्रम स्वातंत्र्योतर काळात महाराष्ट्र किंवा भारत सरकारला साकारणेच शक्य झालेले नाही. आगामी सुमारे एक हजार वर्षाचा काळ नजरेसमोर ठेवून जलसंधारणाबाबत धोरण राबवून ब्रिटिशांनी पश्चिम महाराष्ट्राचा केलेला कायापालट उल्लेखनीय आहे.औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावत असलेल्या महाराष्ट्रातील पुणे परिसरात मुळा, मुठा याअतिप्रदूषण असलेल्या नद्यांचे पाणी उजनी धरणामध्ये येत असून, त्याचा वापर जनतेमार्फत शेतीसाठी व वैयक्तिक कारणास्तव केला जातो. या नद्यांचे पाणी अति प्रदूषित असून , ते धरणाद्वारे पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर परिसरामध्ये विशेषत : भरपूर प्रमाणात विविध कारणास्तव वापरले जाते.

**प्रश्न** १) पश्चिम महाराष्ट्र कशामुळे संपन्नतेकडे वाटचाल करीत आहे ?
२) पश्चिम महाराष्ट्रातील जनसामान्य जीवन कशामुळे सुकर बनले आहे ?
३) ब्रिटिशांनी पश्चिम महाराष्ट्राचा कायापालट करण्यासाठी कोणते धोरण राबविले ?
४) मुळा, मुठा नद्यांच्या पाण्याचा वापर कसा केला जातो ?
५) मुळा, मुठा नद्यांचे पाणी कसे आहे ?

२३. आपला देश कृषिप्रधान आहे आणि ७० टक्के लोक शेती व त्यावर आधारित उद्योगांवर जगतात. आपल्या देशातून निर्यात होणाऱ्या मालांपैकी बहुतांश माल हा रीतमाल असतो. अशा परिस्थितीत शेतीविषयक ज्ञान व जाण असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, शेतीत पुरेशी प्राप्ती नाही, पोट भरत नाही म्हणून मोठया शहरात मजुरी करण्यासाठी जाणाऱ्या लोकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच होत आहे. गावे ओस पडू लागली आहेत तर शहरांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. आज एकीकडे बेरोजगारी आहे, तर दुसरीकडे शेतात काम करायला मजूर मिळत नाहीत. याकरिता शेती-सुधारणेकडे आवश्यक लक्ष दिले पाहिजे. शेतीचे ज्ञान देऊन शेतीचे सरासरी उत्पन्न वाढविले पाहिजे. त्यातून देशाचे कल्याण होईल. शेतीचे ज्ञान आरोग्यविज्ञानाच्या ज्ञानासारखे आहे. आरोग्यविज्ञान फक्त पुस्तके वाचून कधीच पूर्णपणे आत्मसात होत नाही, त्यासाठी रोग्यांसोबत काम करावे लागते. तसेच शालेय शिक्षणात जर शेतीविषयक ज्ञान द्यायचे असेल तर फक्त पुस्तकी ज्ञान असून चालणार नाही. त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड द्यावी लागेल.

आज आपण म्हणतो की, प्रत्येकाने संगणक साक्षर असायला हवे, कारण जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात संगणकाने प्रवेश केलेला आहे त्याहीपेक्षा जास्त संबंध शेतीचा आपल्या जीवनाशी आहे. असे म्हटल्यास वावगे होणार नाही की, शेतीच जीवनाचा मूलाधार आहे. त्यामुळे शेतीविषयीची साक्षरता असणे प्रत्येकालाच गरजेचे आहे.

**प्रश्न** १) आपल्या देशातील ७० टक्के लोक कशावर उदरनिर्वाह करतात ?
२) लोंक मजुरी करण्यासाठी शहरात का जात आहेत ?
३) देशाच्या कल्याणासाठी काय केले पाहिजे ?
४) शेतीचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी काय करावे लागेल ?
५) शेतीविषयक साक्षरता असणे का आवश्यक आहे ?

२४. वाघ वाचवा, अशा हाका केंद्र सरकार रोज जरी देत असले तरी या भागातील वन्यजीव व्यवस्थापनावर त्याचा अजिबात परिणाम झालेला दिसत नाही. गेल्या काही दिवसातल्या घटना पाहता हे व्यवस्थापन कुंभकर्णी झोपेत आहे की काय, अशीच शंका येते. ताडोबाच्या बफर झोनमध्ये फिरणाऱ्या वाघांची अवस्था सध्या भिकाऱ्यासारखी झाली आहे. भिकाऱ्याला दारावरून हाकलून दिले तर त्याला किमान दुसऱ्या दारावर जाऊन परत भीक तरी मागता येते पण, येथील मुक्या प्राण्यांना तोही हक्क नाही. काय हवे हे त्यांना सांगता येत नाही आणि ज्यांना कळायला हवे त्यांनी त्याकडे दुर्लक्षच केलेले आहे. माणसाचा भूकबळी गेला की सारा समाज सुन्न होतो. आता वाघांवरही तीच वेळ आली आहे. वाघाचा भूकबळी ठरणे ही वेदना देणारी गोष्ट असली तरी त्यांच्यासाठी जीव तुटणाऱ्यांची संख्या फार कमी आहे. त्यामुळे समाजातही फारशी खळबळ होताना दिसत नाही.

**प्रश्न** १) वाघ वाचवा अशी हाक देण्याचे कारण कोणते ?
२) वन्यजीव व्यवस्थापनावर याचाही परिणाम होत आहे का ?
३) ताडोबाच्या वाघांची अवस्था कशी आहे ?
४) मुक्या प्राण्यांच्या या अवस्थेस जबाबदार कोण आहे ?
५) वाघाची व माणसाची येथे तुलना कशी केली आहे ?

२५.     बादलच्या भेटीला आता तीन वर्ष होतील.  तेव्हा माझा भाऊ रस्त्यावरील अपघातात वारला होता.  ही बातमी कळताच बादल धावत घरी आला होता.  आपल्या नोकरीविषयी तो नाराज वाटला.  लष्करी छावणीतलं जीवन त्याला आवडत नव्हतं.  काबाडकष्ट आणि वरिष्ठांकडून सातत्याने केला जाणारा पाणउतारा यांमुळे तो निराश झाला होता.  पण युद्धात मरण्या-मारण्याचा विषय निघताच त्याचं रक्त उसळलं व तापल्या आवाजात तो म्हणला. "पाकिस्तान्यांनी हल्ला केला ना, तर आम्ही त्यांना खतम करू."  मी त्याला विचारलं, "तुझ्यावर हल्ला करणारे पाकिस्तानी कोण आहेत?  पोट भरायला व घरी पैसे पाठवायला सैन्यात भरती झालेली तुझ्यासारखीच माणस आहेत ना ती?  ते स्वतःहून तुझ्यावर हल्ला करतात का?  आता भावाच्या मृत्युची बातमी ऐकून तू काश्मीरहून थेट  कटकला धावून आलास, पाकिस्तानी सैनिकांचं काळीज याहून वेगळं असेल का ? यावर तो स्तब्ध राहिला.  काश्मीरला जाताना तो मला म्हणला, पेन्शन लागू झाली का मी ही नोकरी सोडेन. कोणाचा जीव घ्यायला मलाही आवडत नाही."

एकदा तो अर्धमेल्या अवस्थेत घरी पोहचला होता.  ह्या वेळी कोण जाणे काय होईल !  मला खूप भीती वाटते.  युद्ध सुरू आहे.  शेकडो सैनिक मरताहेत.  त्या प्रत्येकात मला बादल दिसतो आहे.  ते मरत आहेत कारण त्यांच्यातील बहुतेकांच्या घरी खायला पोटभर अन्न नाही.

आता हे खूप झालं.  रोजच्या आयुष्यात तुम्ही त्यांना पायदळी तुडवणार आणि मेल्यावर देशभक्त म्हणून गौरवणार!  "ते देशासाठी जन्मले आणि देशासाठी हसत हसत त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली" असं तुम्ही म्हणता ते खोटं आहे.  हा खोटारडेपणा थांबवा.  आता मी हे सहन करू शकत नाही.  त्यांना बोलवा. त्यांना जिवंत घरी येऊ द्या.  माझ्याकडे भरपूर जेवायला आहे.  काल रात्रीच मी रांधून ठेवलाय बादलचा आवडता रोहू मासा आणि भात.

**प्रश्न**   १) बादल यापूर्वी लेखकाला कोणत्या निमित्ताने भेटला होता ?
२) लष्करातील आपल्या नोकरीविषयी बादलला काय वाटत असे ?
३) भारतीय सैनिक आणि पाकिस्तनी सैनिक यांच्यात काय साम्य आहे?
४) लेखकाला कशाची भीती वाटते ?
५) समाज सैनिकांशी कसा दुटप्पी व्यवहार करतो ?

२६.     ज्याप्रमाणे मनुष्यप्राण्याला अन्नाची जरूरी आहे, त्याप्रमाणे सर्वांना विद्येची जरूरी आहे.  विद्या ही दुधारी तलवारीसारखी असते.  विद्येने दुष्टांचा संहार करता येतो व दुष्टांपासून रक्षणही करता येते.  माझ्या मते केवळ विद्याच पवित्र असू शकत नाही.  प्रज्ञा म्हणजे शहाणपणा, शील म्हणजे सदाचरणयुक्तं आचरण, करूणा म्हणजे सर्व मानवजातीसंबंधी प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे सर्वच प्राणीमात्रांविषयीची आत्मीयता.  विद्येबरोबर चार पारमिता असल्या पाहिजेत, तरच विद्ववत्तेचा काही उपयोग आहे.  विद्येबरोबर मानवाजवळ करूणा नसली तर तो दानव आहे, असे मी समजतो.  विद्या, पूजा, करूणा, शीलआणि मैत्री या पंचतत्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्याने आपले चारित्र्य बनवले पाहिजे आणि या मार्गाने एकटयानेच जावे लागले तरी मनोधैर्य व निष्ठा राखून गेले पाहिजे.  "महाजनो येन गतः स पन्थः"ही परप्रत्ययेन बुद्धी सोडून विवेकाने जो मार्ग आपणास योग्य वाटेल त्याच मार्गाने पुढ गेले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रश्न**   १) मनुष्यप्राण्याला अन्नाप्रमाणे आणखी कशाची जरूरी आहे?
२) दुधारी तलवारीसारखी काय असते?
३) दुष्टांचा संहार कशाने करता येतो?
४) विद्येबरोबर कोणाला चार पारमिता असल्या पाहिजेत?
५) प्रत्येक विद्यार्थ्याने कोणत्या पंचतत्वानुसार आपले चारित्र्य बनवले पाहिजे?

**प्रश्न २ रा** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यप्रचारांचे अर्थ लिहून त्यांचा अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा :- **गुण १०**

१. शिंगे फुटणे
२. मात्रेचे वळसे घेणे
३. सुगावा लागणे
४. नेस्तनाबूत करणे
५. उन्हाने चेहरा टाकणे
६. ओचापदर करणे
७. अनुग्रह करणे
८. घोडयावर मांड ठोकणे
९. घोडी देणे
१०. नावे ठेवणे
११. पंक्तिप्रपंच करणे
१२. चोपडी टाकणे
१३. पहिले पाढे पंचावन (पंचावन्न) होणे
१४. क्रोधाचा बाहुटा खाली पडणे
१५. फडशा पाडणे
१६. विचारसरणी अपक्व असणे
१७. आज्ञेचे उल्लंघन करणे
१८. तारांबळ उडणे
१९. दांडी मारणे
२०. ध्यास घेणे
२१. छिद्रे झाकणे
२२. हरवून बसणे
२३. थक्क होणे
२४. अव्यापारेषु व्यापार
२५. झुबके धुमारणे
२६. फतकल मारून बसणे
२७. माती धुपणे
२८. भुईसपाट होणे
२९. चुपीत बसणे
३०. गड नांदता होता
३१. उदेजला होता

**प्रश्न ३ रा** गट एक मधील शब्दांची गट दोन मधील समानार्थी शब्दांबरोबर जुळणी करा :- **गुण १०**

| | **गट " एक"** | | **गट "दोन"** |
|---|---|---|---|
| १. | चारित्र्य | अ | विवेचन |
| २. | श्रवण | आ | बारीक केस |
| ३. | निष्ठूर | इ | गुर्मी |
| ४. | अस्वस्थता | ई | साहित्य |
| ५. | विधायक | उ | शील |
| ६. | वाङ्मय | ऊ | निर्दय |
| ७. | निरूपण | ए | ऐकणे |
| ८. | मस्ती | ऐ | उलघाल |
| ९. | खेळकर | ओ | हितकारक |
| १०. | लव | औ | अल्लड |

| | **गट " एक"** | | **गट "दोन"** |
|---|---|---|---|
| १. | आठवण | अ | उन्नती |
| २. | वारु | आ | स्मरण |
| ३. | दैन्य | इ | निर्दय |
| ४. | खिन्न | ई | भयंकर |
| ५. | पिता | उ | गरिबी |
| ६. | सरिता | ऊ | नदी |
| ७. | निष्ठुर | ए | घोडा |
| ८. | क्षमा | ऐ | उदास |
| ९. | घनघोर | ओ | जनक |
| १०. | भरभराट | औ | माफी |

| | **गट " एक"** | | **गट "दोन"** |
|---|---|---|---|
| १. | अनन्वित | अ | बेचैनी |
| २. | गर्ता | आ | मस्ती |
| ३. | उलघाल | इ | पद्धत |
| ४. | गुर्मी | ई | अतोनात |
| ५. | रिवाज | उ | शुष्क |
| ६. | वैराण | ऊ | दरी |
| ७. | अभूतपूर्व | ए | प्रतिध्वनी |
| ८. | पडसाद | ऐ | आनंद |
| ९. | निशा | ओ | नवीन |
| १०. | हरीख | औ | रात्र |

| | गट " एक" | | गट "दोन" |
|---|---|---|---|
| १. | मयुर | अ | निशा |
| २. | आई | आ | सोने |
| ३. | रात्र | इ | मेघ |
| ४. | कनक | ई | राघू |
| ५. | ढग | उ | मोर |
| ६. | पोपट | ऊ | वीज |
| ७. | अंग | ए | आठवण |
| ८. | विद्युत | ऐ | माता |
| ९. | स्मरण | ओ | उत्साह |
| १०. | हुरुप | औ | तन. |

| | गट " एक" | | गट "दोन" |
|---|---|---|---|
| १. | निरुपण | अ | सतत |
| २. | श्रवण | आ | प्रशंसनीय |
| ३. | शुचिता | इ | एकजूट |
| ४. | प्रत्यही | ई | ऐकणे |
| ५. | स्पृहणीय | उ | विवेचन |
| ६. | संघभावना | ऊ | पावित्र्य |
| ७. | विराट | ए | नृत्य |
| ८. | मार्दव | ऐ | कंगाल |
| ९. | कफल्लक | ओ | मृदुता |
| १०. | नर्तक | औ | भव्य |

| | गट " एक" | | गट "दोन" |
|---|---|---|---|
| १. | अज्ञ | अ | दैन्य |
| २. | चारित्र्य | आ | मोफत |
| ३. | लोणी | इ | शपथ |
| ४. | रिवाज | ई | शीतल |
| ५. | निशु :ल्क | उ | वन |
| ६. | आण | ऊ | घर |
| ७. | थंड | ए | अडाणी |
| ८. | जंगल | ऐ | पद्धत |
| ९. | गरीब | ओ | शील |
| १०. | सदन | औ | नवनीत |

**प्रश्न४ था** पाठ्यपुस्तकातील पाठांच्या आधारे खालीलपैकी **पाच** प्रश्नांची ५ ते ६ ओळीत उत्तरे लिहा :- **गुण २०**

(१) पदयात्रा निघण्याच्या समारंभाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?
(२) वेरुळच्या लेण्याविषयीची कोणतीही एक दंतकथा लिहा.
(३) वेरुळच्या लेण्यांबाबत लेखकाला कसा अचंबा वाटतो?
(४) "ह्या कलासक्त दगडात ओलावाही आहे तर!" ह्या वाक्याचे स्पष्टीकरण करा.
(५) कपारीतल्या तळ्याकाठी लेखकाने कोणते दिवास्वप्न पाहिले?
(६) बुध्दलेण्यांमध्ये आजच्या आणि कालच्या काळात कोणता फरक लेखकाला जाणवतो?
(७) वेरुळ गावात लेखकाच्या राहण्याजेवणाची व्यवस्था कशी होती?
(८) "मराठयांच्या राजाला वैराग्य शोभत नाही, पराक्रम शोभतो" असे तुकाराम महाराज का म्हणतात?
(९) "रांगडा शिपाईगडी" कोण आहे व का?
(१०) तुकाराम महाराजांसाठी आणलेल्या भेटवस्तू त्यांनी का स्वीकारल्या नाहीत?
(११) तुकाराम महाराजांनी ऐहिक आणि पारमार्थिक जीवनाची सांगड कशी घालायला शिकवली?
(१२) शिवाजी महाराजांनी तुकाबांकडे काय मागणे मागितले?
(१३) तुकोबांकडे मिळालेले गूळदाणे शिवाजी महाराजांनी का खाल्ले नाहीत?
(१४) जिजाईने शिवाजी महाराजांना गुळाबद्दल काय विचारले? का?
(१५) नाजूकाने पाचच गणिते का केली होती?
(१६) मास्तरनी नाजुकाला हातावर छड्या मारल्यामुळे तिचा हात दुखत असातनाही तिने आईला का सांगितले नाही?
(१७) मास्तरांनी नाजाला शिक्षा का दिली?
(१८) नाजाच्या शिक्षणाबाबत आईचा दृष्टिकोन कोणता होता?
(१९) मास्तरांनी शिक्षा केली हे नाजाने घरी का सांगितले नाही?
(२०) स्कॉलरशिपबद्दल लोकमान्य टिळकांनी कोणते मत मांडले?
(२१) प्रो. हॅथॉर्नवेट यांना लोकमान्य टिळकानी कशाप्रकारे धडा शिकविला?
(२२) गणिताचे शिक्षक म्हणून लोकमान्य टिळकांची कोणती वैशिष्टये या पाठातून दिसतात?
(२३) लोकमान्य टिळकांनी काव्यातील गणित कसे दाखवले?
(२४) गणित या विषयाकडे लोकमान्य टिळक कोणत्या दृष्टीने पाहत होते?
(२५) लोकमान्य टिळकांच्या शिकवणीविषयीच्या वामनराव तळवळकर यांनी सांगितलेल्या आठवणी लिहा.
(२६) अभिषेक आणि यंतम् यांची मैत्री कशी जमली याचे वर्णन करा.
(२७) अभिषेकच्या आईने "यंतम्" ला पुन्हा घरी आणण्याची परवानगी का दिली ?
(२८) लक्ष्मीबाईंच्या सेवाभावी वृत्तीचे वर्णन करा.

(२९) दुर्गाबाईंच्या आठवणीतल्या लेखिका आजी कशा होत्या ?

(३०) अभिषेकच्या बाबांना "यंतम्" ला सहा महिन्यांच्या अभिषेकपासून दूर ठेवावे असे का वाटत नाही ?

(३१) अभिषेकच्या आईला "यंतम्" का आवडेनासा झाला?

(३२) लक्ष्मीबाईंच्या रंगरूपाचे थोडक्यात वर्णन करा.

(३३) अभिषेकच्या बाबांनी"यंतम्" ला आपल्या घरी का व कोठून आणले?

(३४) "यंतम्" अभिषेकची काळजी कशाप्रकारे घेत होता?

(३५) आपल्याला जाणवणाऱ्या भावना यंत्रमानवास का जाणवत नाहीत?

(३६) लक्ष्मीबाईंच्या लेखनाच्या यशाची कोणती कारणे लेखिकेने नमूद केली आहेत?

(३७) लक्ष्मीबाई आजारी व्यक्तींची सेवा कशाप्रकारे करीत?

(३८) लक्ष्मीबाईंच्या मनोवृत्तीचे वर्णन करा.

(३९) "चित्ताची एकाग्रता" पाठातून लेखकाने चित्त एकाग्र कसे करावे त्याचे वर्णन कसे केले आहे?

(४०) "चित्ताची एकाग्रता" करण्यातील अडचणी कोणत्या?

(४१) "चित्ताची एकाग्रता" या पाठात लेखकाने आपण आपल्या आत्म्याची ज्ञानशक्ती क्षुद्र वस्तूंच्या चिंतनात खर्च करतो असे का म्हटले आहे?

(४२) "चित्ताची एकाग्रता" या पाठात मोठयांची एकाग्रता सहजपणे का होत नाही असे म्हटले आहे?

(४३) "चित्ताची एकाग्रता" या पाठात लेखकाने आपण संसारात रमल्यामुळे त्याचे होणारे परिणाम कसे स्पष्ट केले आहे?

(४४) "चित्ताची एकाग्रता" या पाठात मनुष्याला इंद्रियांचा गुलाम का म्हटले आहे?

(४५) परमेश्वराने सर्व माणसे सारखी निर्मिलेली असताना त्यांच्यामध्ये फरक का दिसतो?

(४६) बंडूवर कोण कोण रागावले व का?

(४७) घरातील मोठी मंडळी रागावल्यावर बंडूच्या मनात कोणते विचार आले?

(४८) आपल्या मनातील इच्छा बंडूने कशाप्रकारे पूर्ण केली?

(४९) "बाबांचे व्याकरणच कच्चे!"असे बंडूला का वाटते?

(५०) घराबाहेर पडल्यावर बंडूने पावसाचा आनंद कसा घेतला?``

(५१) बंडूने कोणता निश्चय केला होता व का?

(५२) बंडू व त्याच्या मित्रांनी घरात कशाप्रकारे धांगडधिंगा घातला?

(५३) नाजा धोतर नेसून शाळेत का व कशी गेली?

(५४) नाजाची शिक्षणाची तळमळ कशी दिसून येते?

(५५) भाऊसाहेब लवाटे यांनी टिळकांची कोणती आठवण सांगितली आहे?

(५६) "आमचे मास्तर" या पाठातील मास्तरांचे व्यक्तिचित्रण लेखकाने कसे केले आहे?

(५७) टेमलाईच्या पठाराचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

(५८) बुधाची झोपडी व आजूबाजूचा परिसर यांचे वर्णन करा.

(५९) बुधा निवृत्त का झाला ?

(६०) मास्तरांनी पंढरीची समजूत कशी काढली?
(६१) भैरोबाच्या पालखीचे वर्णन कसे केले आहे?
(६२) मास्तरांनी लंबोदराचे कौतुक कोणत्या शब्दांत केले?
(६३) बुधाचे लहानपण कसे गेले?
(६४) बुधाने निवृत्त झाल्यावर माचीला जाण्याचा निर्णय का घेतला?
(६५) बुधाचे निसर्गाशी अतूट नाते लहानपणापासून कसे होते?
(६६) मुंबईच्या माणसांनी निसर्गाशी कशाप्रकारे रममाण व्हावे असे बुधाला वाटते?

**प्रश्न ५ वा** अ) ---------- या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :- **गुण १०**

किंवा

आ) ---------- या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

१. "चित्ताची एकाग्रता" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-
(१) मनातील चक्र बंद करण्यासाठी काय करावे?
(२) लहान मुलांना शाळेच्या चार भिंतीच्या आत का शिकवितात?
(३) मनाची धाव सारखी बाहेरच वाहत राहिल्याने काय परिणाम होतो?
(४) डोळे अधोन्मीलिन का ठेवावेत?
(५) मनाची ठेवण बदलण्यासाठी काय करावे?

२. "बाबांचे व्याकरणच कच्चे!" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-
(१) "बाबांचे व्याकरणच कच्चे!" या पाठात लेखकाने कोणत्या गोष्टीचा वेध घेतला आहे?
(२) "बंडूला" प्रमुख भूमिका देऊन लेखकाने आपले विचार कसे मांडले आहेत?
(३) बंडूकडे असलेल्या अंगभूत बंडखोरीची ओळख करून द्या.
(४) "बाबांचे व्याकरणच कच्चे!" या पाठातील बंडू असा का वागतो हे सुस्पष्ट करा?
(५) बंडूच्या व्यक्तीरेखेचे थोडक्यात वर्णन करा.

३. "वेरूळची लेणी" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-
(१) प्रचंड प्राण्यांमध्ये सर्वात मोहक प्राणी कोणता? त्याला कोणी मोहक केले?
(२) "काळाशी युध्द करता करता हत्तींच्या सोंडा तुटल्या" ह्या वाक्याचा अर्थ स्पष्ट करा.
(३) वेरुळ गावातील लेखकाची रात्र का वाईट गेली ?
(४) घृणेश्वराने भोसले कुळाला काय आशीर्वाद दिला होता?
(५) खुलताबादकडे जाताना खालच्या दरीत कसा देखावा होता?

४. "भेट" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) मराठयांचा राजा बैरागी झाल्यावर प्रजेवर काय परिणाम होईल असे तुकाराम महाराजांना वाटते?

(२) मराठयांचे काय काय रांगडे आहे असे तुकाराम महारात म्हणतात?

(३) शिवाजी महाराजांनी दिलेले दागदागिने पाहून जिजाईची काय प्रतिक्रिया होते? तुकाराम तिला कसे सावध करतात?

(४) शिवाजी महाराजांना गूळदाणे देताना जिजाई तुकोबांना काय ऐकवते?

(५) शेंगदाणे आणि गूळ कुठून आणलेला आहे?

५. "यंतम्" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) अभिषेक किती महिन्यांचा असताना बाबांनी यंतम्ला घरी आणले व का ?

(२) अभिषेकच्या बाबांना कोणत्या प्रकारचा यंत्रमानव नको होता त्याचे कारण कोणते ?

(३) यंत्रमानवाच्या मेंदूवर बसवण्यात येणारे नियम कोणते ?

(४) अभिषेकची आई बेशुध्द पडली त्याचे कारण सांगा.

(५) एके दिवशी अभिषेक का रडायला लागला ?

६. "मला साळंत जायचयं!" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) नाजा गणिताचा अभ्यास का करू शकली नाही यांची कारणे द्या.

(२) नाजाच्या शिक्षणाबाबत आईला काळजी का वाटत होती?

(३) मुलींच्या शिक्षणाविषयी त्याकाळी कोणती परिस्थिती होती?

(४) नाजाच्या भावाचे शिक्षण अर्धवट का सुटले?

(५) च्मी तुला मारले हे घरी सांगू नकोसछ असे गुरूजी नाजाला का म्हणाले?

७. "लोकमान्य टिळकांच्या आठवणी" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) लोकमान्य टिळकांना शिष्यवृत्त्या मिळत नसल्याचे कोडे त्यांच्या चुलत्यांना का पडत असे?

(२) लोकमान्य टिळकांचे "स्कॉलरशिप" संबंधातील मत सांगा.

(३) साहेब (हॅथॉनीवेट) यांना पुस्तकातील उत्तराशी त्यांचे उत्तर जुळत नसल्यामुळे त्यांची झालेल्या गैरसमजुतीचे वर्णन करा.

(४) गणित या विषयासंबंधातील टिळक व पांगारकर यांची चर्चा याबाबत थोडक्यात वर्णन करा.

(५) लोकमान्य टिळकांचे गणित या विषयाशी असलेले अतूट नाते आपल्या शब्दात मांडा.

८. च्नाशिकने मानलेली आजीछ या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) लक्ष्मीबाई टिळकांच्या संबंधात थोडक्यात माहिती द्या.

(२) लेखिका दुर्गा भागवत यांनी लक्ष्मीबाईंच्या लेखनविषयी कोणती माहिती दिली आहे?

(३) लक्ष्मीबाईने लेखिकेचे पहिल्या भेटीत कसे स्वागत केले?

(४) लक्ष्मीबाईंना कोणता छंद होता?

(५) लक्ष्मीबाईंना लेखिकेच्या आजोबांना पत्र का पाठविले? त्यामधून त्यांची कोणती ओळख दिसून येते ?

९. "आमचे मास्तर" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) सारे लोक भैरोबाची पालखी म्हणून का हिणवीत असत?

(२) मुलं पुढच्या शिक्षणाकरता बाहेरगावी जाताना राजवाडयावर का जात असत?

(३) या व्यक्तिचित्रामध्ये "आमचे मास्तर" याच्याविषयी लेखकाला काय म्हणावयाचे आहे?

(४) लंब्याच्या गावठी बॅटरी संबंधात माहिती द्या.

(५) लंब्याच्या गावठी बॅटरीचे मास्तर व मुलांनी कसे कौतुक केले?

१०. "माचीवरील बुधा" या पाठाच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) "तळी" च वर्णन करा.

(२) उंबराच्या झाडाचे वर्णन करा.

(३) बुधा घरी केव्हा बसला?

(४) छोटुकली डोणी कशी आहे?

(५) बुधानं कोणाला लेक मानले होते?

**प्रश्न ६ वा** अ) ---------- या कवितेच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :- **गुण १०**

किंवा

आ) ---------- या कवितेच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

१. "मी घरात आले" या कवितेच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) जमीन कवयित्रीला काय म्हणाली?

(२) कवयित्री चुलीसाठी व जात्यासाठी कोणकोण झाली?

(३) कवयित्रीला घरासाठी आणखी कोणकोणत्या वस्तू बनावे लागले?

(४) कवयित्रीने घरामध्ये कोणकोणती नाती निभावली?

(५) घरासाठी इतके सगळे करण्याचा परिणाम काय झाला असे कवयित्रीला वाटते?

२. "जुने घर" या कवितेच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची सक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) पोरवयातील मुलीने अंगणात पाऊल टाकण्याच्या आधी कोणाच्या पायावर डोंके टेकवले?

(२) जुन्या घरातील मुलीला बाहेर जाताना पाहून जुने घर काय पुटपुटले?

(३) जुन्या घरातील मुलगी बाहेर जाताना अंगणात काय होते?

(४) कवयित्री जाताना पायाला काय चिकटवून बाहेर पडली?

(५) "जुने घर" या कवितेच्या कवयित्रीचे नाव लिहा.

३. "गाण्याच्या शोधात" या कवितेच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची सक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) माणसाचे आणि गाण्याचे नाते कसे आहे?

(२) गाणे नसेल तर काय होईल असे कवीला वाटते?

(३) गाणे जगण्याचा पाया आहे असे कवीला का वाटते?

(४) माणसे कशाच्या शोधात निघाली आहेत?

(५) जीवन व गाणे यांचा नातेसंबंध सांगा.

४. "मानवता" या कवितेच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची सक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) "अन्याय " झाला तर कविला कसे वाटते?

(२) जो काही अन्याय होईल त्याची झळ कविला लागते ते सोदाहरण द्या.

(३) कविने मानवतावादी विचाराचे दर्शन कसे घडविले आहे?

(४) "मानवता" या कवितेत कवीने आपले दु:ख कसे व्यक्त केले आहे?

(५) कवी कोणाशी नवीन नाते जोडू पाहात आहे?

५. "दुष्काळ" या कवितेच्या आधारे खालील **पाच** प्रश्नांची सक्षिप्त उत्तरे लिहा :-

(१) दुष्काळात झाडे कशी वागतात?

(२) दुष्काळात पाखरे काय करतात?

(३) दुष्काळाचा परिणाम कोणाकोणावर होतो?

(४) दुष्काळात पाखरांचे मृतदेह का दिसत नाहीत?

(५) झाडे व पक्षी यांच्या प्रतिमांमधून कवीला माणसांना कोणता संदेश द्यावयाचा आहे?

**प्रश्न ७ वा** खालीलपैकी **पाच** इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय लिहाः- **गुण ५**

१. Auditor
२. Budget
३. Chief Secretary
४. Deputy Director
५. Executive Engineer
६. Press release
७. Forwarded
८. Endorsement
९. Notification
१०. Reference.
११. Council
१२. Ballot Papr
१३. Joint editor
१४. Slogan
१५. Cheque
१६. Promotion
१७. Copy right
१८. Tourism
१९. Manifesto
२०. Information
२१. Recognition
२२. Teacher
२३. Commission
२४. Declaration
२५. Federation
२६. Suggestion
२७. Income
२८. Local
२९. Expenditure
३०. Meeting.
३१. District
३२. State
३३. Agreement
३४. Training
३५. Duty
३६. Budget
३७. Gazette
३८. Copyright
३९. Executive
४०. Adjustment
४१. Visit book`
४२. Major head
४३. Inspection
४४. Surcharge
४५. Account
४६. Retrospective
४७. Assessment
४८. Tax
४९. Sale agreement
५० Written off

**प्रश्न ८ वा** खालील इंग्रजी प्रश्नांची उत्तरे मराठीत पूर्ण वाक्यात लिहा:- **गुण ५**

१. What is the day today?
२. Can I leave the office after lunch?
३. What did your officer say?
४. Where do you work?
५. How much time do you devote to write ?
६. What is your office timing ?
७. When do you return home in the evening?
८. Do you have a pen ?
९. What is the date today ?
१०. Do you come in office in time ?
११. Where is your office ?
१२. Which day comes after Wednesday?
१३. What is your basic pay ?
१४. How many brothers you have ?
१५. When was the maharashtra state formed ?
१६. When did you send a reminder ?
१७. How long have you been studying ?
१८. Why are you late ?
१९. Did you write the note ?
२०. At what time does the milkman come to your house ?
२१. Where do you stay ?
२२. Which is the shortest month ?
२३. What is library ?
२४. Who is the called grandfather ?
२५ How many days make a week?
२६ What day will it be tomorrow?
२७ What is your Designation?
२८ What is the capital of Maharashtra?

**प्रश्न ९ वा** खालील अंक अक्षरात लिहा :- **गुण ५**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ६६ ÷ ६ = ११ | १६. | ११२ |
| २. | ४८ -२ =४६ | १७. | १३ १ / २ |
| ३. | ३७ + ०७ = ४४ | १८. | १० + २ = १२ |
| ४. | ८५५ | १९. | ९ x ९ = ८१ |
| ५. | ९ x ३ =२७. | २०. | ३१ - २ = २९ |
| ६. | ६२७ | २१ | २२ ÷ ११= २. |
| ७. | २१ + ४६ = ६७ | २२. | ५२३ |
| ८. | १२ x ४ = ४८ | २३. | ४०-१२ = २८ |
| ९. | ५८-३४ = २४ | २४ | ७ x ८ = ५६ |
| १०. | ७२ ÷ ८ = ९ | २५ | १५ + १६ = ३१ |
| ११. | ६३० | २६. | ३६÷ ३ = १२ |
| १२. | ५५ - १३ = ४२ | २७. | ४४५ |
| १३. | २५+ ११ = ३६ | २८. | २२ + १५ = ३७ |
| १४. | ५५ ÷ ५= ११ | २९. | ७१ - ५५ = १६ |
| १५. | ८ x ९ = ७२ | ३०. | २५ x ४ = १०० |

**प्रश्न १० वा** खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचा अर्थ पूर्ण वाक्यात उपयोग कराः- **गुण ५**

१. अपरंपार
२. ग्रंथालय
३. अर्धोन्मीलित
४. चिकित्सा
५. चिपटं
६. परिमितता
७. ज्ञान
८. प्रावीण्य
९. जंबिया
१०. जीवश्चकंठश्च
११. डोणी
१२. मथणी
१३. यथेच्छ
१४. विधायक
१५. शिरस्त्राण
१६. शील
१७. अधिकार
१८. भिक्षू
१९. निरक्षर
२०. अहोरात्र
२१. निमंत्रण
२२. नमुना
२३. वाळवंट
२४. उपवास
२५. भोंगळ
२६. आश्रय
२७. चळवळ
२८. कविता
२९. पालवी
३०. वैराग्य
३१. सुगंध
३२. मनसुबा
३३. रुढी
३४. देखावा
३५. पवित्र
३६. वृक्षवेष्टित
३७. वळसा
३८. रांगडा
३९. निद्रा
४०. चिंता

**प्रश्न ११ वा** खालील शब्दांचे लिंग बदला व शब्द लिहा**:-** **गुण ३**

(१) (२) (३)

१. वृद्ध
२. गायक
३. तेली
४. नदी
५. पाहुणा
६. नर
७. बैल
८. राजकन्या
९. तरुण
१०. कलाकार
११. युवक
१२. बालक
१३. देव
१४. अध्यापक
१५. नायक
१६. कावळा
१७. मोर
१८. चिमणी
१९. लेखिका
२०. पक्षी
२१. सेवक
२२. महाराजा
२३. मातृत्व
२४. भक्त
२५. मास्तर
२६. शिक्षक
२७. प्राचार्य
२८. महोदय
२९. धोबी
३०. नायक

**प्रश्न १२ वा** खालील शब्दांचे वचन बदला :- **गुण ३**

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १. वृक्ष | | ३१. तेली |
| २. जहाज | | ३२. कोळी |
| ३. वही | | ३३. पेरु |
| ४. भिंत | | ३४. लाडू |
| ५. खुंटी | | ३५. वेळ |
| ६. पिशवी | | ३६. सून |
| ७. डबा | | ३७. पागा |
| ८. आरसा | | ३८. टीका |
| ९. टाळी | | ३९. रीती |
| १०. पैसा | | ४०. रूची |
| ११. प्रेक्षक | | ४१. भक्ति |
| १२. वसाहत | | ४२. काठी |
| १३. पाटी | | ४३. नदी |
| १४. ग्रंथ | | ४४. चुलती |
| १५. फूल | | ४५. बायको |
| १६. पुस्तक | | ४६. घर |
| १७. शेत | | ४७. मिरी |
| १८. खुर्ची | | ४८. मोती |
| १९. केस | | ४९. वासरू |
| २०. डोळा | | ५०. पाखरू |
| २१. मोसंबी | | ५१. आसू |
| २२. मूर्ती | | ५२. गळू |
| २३. कुत्रा | | ५३. भांडे |
| २४. खांब | | ५४. तळे |
| २५. वाघ | | ५५. बोलणे |
| २६. सुतार | | ५६. कुंभारीण |
| २७. बकरा | | ५७. कोशिंबीर |
| २८. मेंढा | | ५८. देऊळ |
| २९. आंबा | | |
| ३०. न्हावी | | |

**प्र.१३** खालील वाक्यांपढे कंसात दिलेल्या क्रियापदांची योग्य रूपे योजून वाक्ये पुन्हा लिहा. **गुण ४**
(कोणतीही **चार**)

१. आई स्वत: ------------- नाही. (जेवणे)
२. मदारी नाथांची भक्ती ------------- (करणे)
३. माणसाला विद्येची गरज ------------- (असणे)
४. मदारी ------------- पकडतात. (साप)
५. डॉ. आंबेडकरांनी ------------- दैवत मानले. (शील)
६. गाडगे बाबांची ------------- पद्धत वेगळी होती. (किर्तन)
७. ज्ञानाशिवाय तो काय करु ------------- (शकणे)
८. त्यांचे हृदय तीळ तीळ ------------- होते. (तुटणे)
९. वियोग होणार असेल तर इथेही ------------- (होणे)
१०. विद्यार्थ्यांनी अभ्यास ------------- (करणे)
११. हसनजवळ किती प्रकारचे साप ------------- ? (असणे)
१२. मदारी लोक नागाला ------------- (पकडणे)
१३. मी सकाळी सहा वाजता ------------- (उठणे)
१४. स्त्रिया महिला मंडळात ------------- (जाणे)
१५. मदारी ------------- भक्ती करतात. (नाथ)
१६. संगणकाला ------------- नसते. (बुद्धी)
१७. आम्ही ------------- झोपलो. (सावली)
१८. मी परीक्षेत अभ्यास ------------- उत्तीर्ण झालो. (करणे)
१९. मी माझ्या विभागीय ------------- प्रथम आलो. (परीक्षा)
२०. मी परीक्षेसाठी जास्त अभ्यास केला ------------- तर प्रथम आलो ------------- (असणे)
२१. मी सकाळी लवकर ------------- योगासने करतो. (उठणे)
२२. मी नेहमी अभ्यासासाठी योबकुटीरामध्ये ------------- (जातो)
२३. संगणक दिलेल्या आदेशांची अमलबजावणी ------------- (करणे)
२४. संगणकाची गती प्रचंड ------------- (असते)
२५. घोडा सुसाट ------------- लागला. (धावणे)
२६. पावसाळयात ------------- पडण्याचे प्रकार जास्त होतात. (घसरणे)
२७. पावसाळयात झारे हिरवीगार ------------- (दिसणे)
२८. पावसाळयात विविध प्रकारचे साथीचे रोग ------------- (पसरणे)
२९. कामाशिवाय वेळ फुकट ------------- नये. (घालणे)
३०. आम्ही झाडाच्या ------------- झोंपलो. (सावली)
३१. रात्रौ झाडाखाली ------------- नये. (झोपणे)
३२. त्याला नदीत ------------- येते. (पोहणे)
३३. त्याला चांगलेच ------------- येते. (नाचणे)
३४. गुरू हे आपणास ज्ञान ------------- (देणे)
३५. गुरूशिवाय अभ्यासात गती ------------- नाही. (येणे)
३६. आपण अभ्यास ------------- तरच उत्तीर्ण व्हाल. (करणे)

३७. तुम्ही एतदर्थ मंडळाची परीक्षा उत्तीर्ण ------------- आहे का ? (करणे)
३८. प्रत्येकाने दुसऱ्यास ------------- ------------- आवश्यक आहे. (मदत)
३९. कष्ट केल्याशिवाय अन्नाची ------------- लागत नाही. (गोड)
४०. कार्यालयात ------------- ------------- रहावे. (वेळ/उपस्थिती)
४१. सर्व कर्मचारी हे शासनाचे ------------- आहेत. (सेवा)
४२. शासन दरबारी आलेली प्रत्येक व्यक्ती ही ------------- ------------- असते. (भारताची)
४३. प्रत्येक शासकी कर्मचाऱ्याने ----------- ----------- प्रशिक्षण घ्यावे. (संगणक/चालविणे)
४४. मराठी भाषा ------------- ------------- वापरली जाते. (शासन/व्यवहार)
४५. मराठी भाषेवर प्रत्येकाने ------------- ------------- पाहिजे. (प्रेम)
४६. शासकीय परिपत्रक मराठी ------------- ------------- काढण्यात यावे. (भाषा/मध्ये)
४७. वरिष्ठांच्या आदेशांचे ------------- ------------- हे कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. (पालन)
४८. जो कष्ट करील तोच ------------- धनी होईल. (सुख)
४९. सतत अभ्यास ------------- बुद्धीचा विकास ------------- येतो. (करणे)